# आता बॅगही नको

बॅग कशी भरायची हे उत्तरार्धात जमले

झेपेल एव्हढेच वजन बॅगेत भरले।

एकट्यालाच झेपतेय ह्याची खात्री केली

कुलुप लावून बॅगेला किल्ली लपवली।

मन पिसासारखं हलकं झालं

एकट्याने सर्वच जमतंय हायस वाटलं।

फेरफटका मारून यावा म्हणून बाहेर पडलो

पाय नेतील तिथे जायचं ठरवलं।

नवीन वाट काही सापडेना

बॅग कुलूप किल्ली विचार जाईना।

तडक माघारी फिरलो

किल्ली चाचपडू लागलो।

वयापरत्वे किल्ली सापडेना

बॅगेचा विचार डोक्यातून जाईना।

मलाच माझी चूक कळली

बॅग कुलपासकट जाळून टाकली।

सारेच हलके हलके वाटू लागले

बॅगेविनाच प्रवास करायचे ठरवले।

आशा अग्निहोत्री।

मला कुणीतरी खालील कविता पाठवली. त्याला माझा वरील प्रतिसाद। जरूर आपल्या प्रतिक्रिया कळवा।

बॅग कशी भरायची

आयुष्याच्या परतीच्या प्रवासासाठी
बॅग कशी भरायची ते

आता मला कळले आहे !

फापट पसारा आवरून सारा,

आता सुटसुटीत व्हायचं आहे !
याच्या साठी त्याच्या साठी,

हे हवं, ते हवं

इथे तिथे - जाईन जिथे,

तिथलं काही नवं नवं

हव्या हव्या चा हव्यास आता

प्रयत्नपूर्वक सोडायचा आहे,

बॅग हलकी स्वतः पुरती

आता फक्त ठेवायची आहे !

बॅग कशी भरायची ते

आता मला कळले आहे !
अपेक्षांच्या ओझ्याखाली

आजवर त्रस्त होतो

आयुष्याच्या होल्डॉल मध्ये

काय काय कोंबत होतो !

किती बॅगा किती अडगळ !

साठवून साठवून ठेवत होतो

काय राहिलं, कुठे ठेवलं

आठवून आठवून पाहत होतो

त्या त्या वेळी ठीक होतं

आता गरज सरली आहे,

कुठे काय ठेवलंय ते ते

आता विसरून जायच आहे

बॅग कशी भरायची ते

आता मला कळले आहे !
खूप जणांनी खूप दिलं

सुख दुखाःचं भान दिलं

आपण कमी पडलो याचं

शल्य आता विसरायचं आहे !
मान, अपमान, ‘मी’, ‘तू’

यातून बाहेर पडायचं आहे !

बॅग कशी भरायची ते

आता मला कळले आहे !
आत बाहेर काही नको

आत फक्त एक कप्पा,

जना - मनात एकच साथी

सृष्टी करता एकच देवबाप्पा !
सुंदर त्याच्या निर्मिती ला

डोळे भरून पाहायचं आहे !

रिक्त -मुक्त होत होत

अलगद उठून जायचं आहे

बॅग कशी भरायची ते

आता मला कळले आहे !

(ही कविता जालावरून)

**- आशा अग्निहोत्री**